प्रहार

मंगळवार, ३१ जानेवारी २०१२

पृ. क्र :- ९

# शिक्षक हा समाज घडविणारा शिल्पकार

## ■ बॅ. नाथ पै शिक्षण संस्थेतर्फे विद्यार्थी गुणगौरव समारंभ
## ■ राजमाता सत्वशिलादेवी भोसले यांचे प्रतिपादन

▶कुडाळ *(शहर वार्ताहर)*

शिक्षक हाच समाजाचा खरा आधारस्तंभ असतो. समाज घडविणारा तो शिल्पकार असतो. शिक्षकाचा आदर्श हाच विद्यार्थी आणि समाजाचा आदर्श असतो याचे भान प्रत्येक शिक्षकाने ठेवले पाहिजे, असे प्रतिपादन सावंतवाडी संस्थानच्या राजमाता सत्वशिलादेवी भोसले यांनी बॅ. नाथ पै शिक्षण संस्थेत केले.


बॅ. नाथ पै शिक्षण संस्था सिंधुदुर्ग संचलित बॅ. नाथ पै महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय व बॅ. नाथ पै अध्यापक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने डी. एड. व बी. एड यशस्वी विद्यार्थी व विद्यार्थीनींचा गुणगौरव समारंभ शनिवारी विद्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी अध्यक्षस्थानी राजमाता सत्वशिलादेवी भोसले, प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध चित्रकार अरूण दाभोलकर, पंचम खेमराज महाविद्यालय सावंतवाडीचे प्राचार्य जी. ए. बुवा, संस्थेचे चेअरमन उमेश गाळवणकर, प्राचार्या सरोज दाभोलकर, डॉ. सौ. दीपाली काजरेकर तसेच विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

यावेळी श्रीमती भोसले बोलताना पुढे म्हणाल्या नोकरीत चांगला पगार मिळाला म्हणून शिक्षकांनी हुरळून जाऊ नये. तर आपली जबाबदारी ओळखून विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण व संस्कार देऊन घडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. भविष्यात तुम्ही शिक्षक व्हाल तेव्हा याचे भान जरूर ठेवा असा सल्ला त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. आज शिक्षण संस्थांचे बाजारीकरण होत आहे. त्यामुळे शिक्षणाचे खच्चीकरण होत आहे हे थांबले पाहिजे. ती जबाबदारी तुम्ही समर्थपणे पार पाडाल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले चित्रकार अरूण दाभोलकर यांनी आजचे युग हे संगणकीय युग आहे. या संगणकीय युगाला माझ्या सारख्या कलाकारालाही आव्हानाला सामोरे जावे लागत आहे. ते कठीण आव्हान तुम्हालाही पेलावे लागणार आहे. ती जिद्द व तयारी ठेवा असे आवाहन केले. ते पुढे म्हणाले प्रत्येक माणसाला जन्मतःच काही गुण अवगत असतात. ते निसर्गाने बहाल केले आहेत. त्यामुळे एखादा 'ढ' विद्यार्थी सुद्धा आपल्या कलागुणांवर नावलौकिक मिळवतो आणि आपले समाजात वेगळे स्थान निर्माण करतो.

सावंतवाडी विद्यालयाचे प्राचार्य जी. ए. बुवा यांनी या संगणकीय युगात कितीही तंत्र व साधने आली तरी गुरूशिवाय उन्नती नाही. गुरूचे महत्व हे पहिल्यासारखेच राहणार आहे असे सांगितले. विद्यार्थी हा शाळेतील शिक्षकांच्या संस्कारावर घडत असतो. त्यामुळे शिकवताना शिक्षकाने काही सिद्धांत आपल्या समोर ठेवले पाहिजेत. असे सांगून त्यांनी पाच सिद्धांतांचे स्पष्टीकरण यावेळी केले. ते म्हणाले शाळेत शिक्षकाचे अनुकरण मुले करत असतात. त्यामुळे त्याने शिकवताना नितीमुल्यांची जपणूक केली पाहिजे. तन - मन - धन लावून शिकवले पाहिजे. चौफेर वाचन केले पाहिजे. अध्यापन प्रक्रियेत जोपर्यंत शिक्षकांचे अंतकरण ओतले जात नाही तोपर्यंत विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील नाते सुदृढ होणार नाही. शिक्षक हाच भविष्यातील समाजाचा कॉम्प्युटर असणार आहे असे सांगितले.

यावेळी २०१०-११ मध्ये यश संपादन केलेल्या डी. एड. व बी. एड विद्यार्थ्यांचा राजमाता श्रीमती सत्वशिला देवी भोसले यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माणीक गावडे व आभार प्रदर्शन ऋचा देसाई हिने केले.



यशस्वी विद्यार्थिनीचा प्रमाणपत्र देऊन गौरव करताना श्रीमती भोसले व मान्यवर.

www.pudhari.com

पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

सिंधुदुर्ग

रविवार | दि. २७ नोव्हेंबर २०११

# देशहिताचे कार्य करा : प्रभू खानोलकर

## कुडाळात २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहीद जवानांना आदरांजली

**कुडाळ : शहर वार्ताहर**

समाजात कार्य करताना एकता, जातीयता, बंधुता, समता या भावनांमी समाजकार्य करा. कोणत्याही क्षेत्रात पैशाचा मोह न करता भ्रष्टाचाराला थारा न देता देशहिताचे कार्य करा, असे आवाहन सेवानिवृत्त पोलिस उपअधीक्षक माधव प्रभूखानोलकर यांनी केले.

बॅ. नाथ पै शिक्षण संस्था, पोलिस ठाणे, कुडाळ तालुका पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहीद झालेल्या जवानांना आदरांजली वाहण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. निरीक्षक जी. के. राठोड यांच्या हस्ते व सेवानिवृत्त पोलिस उपअधीक्षक माधव प्रभूखानोलकर व शहीद कर्नल मनिष कदम यांचे वडील शशिकांत कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत पुष्पचक्र अर्पण करून शहिदांना सलामी देण्यात आली. बॅ. नाथ पैंच्या छात्राध्यापकांनी संचलन करून मानवंदना दिली.



शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी उभारण्यात आलेल्या स्मारकाच्या प्रतिकृतीला पुष्पचक्र अर्पण करताना पोलिस निरीक्षक जी. के. राठोड व सहकारी. (छाया: अथर्व डिजीटल)

कुडाळ पोलिस उपनिरीक्षक सत्यवान कदम, प्रज्ञा देशमुख, पो. कॉ. योगेश सातोसे, बस्त्याव डिसोजा, किरण कदम, पो. हवालदार ए. बी. कदम, बॅ. नाथ पै संस्था चेअरमन उमेश गाळवणकर, प्रा. डॉ. सरोज दाभोळकर, प्रा. डॉ. दीपाली काजरेकर, सौ. अमृता गाळवणकर, शहीद कर्नल मनिष कदम यांची आई सौ. कदम तसेच प्राध्यापक, कर्मचारी व छात्राध्यापक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

प्रभूखानोलकर म्हणाले, देशाची सेवा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. प्रत्येक नागरिकाने आपण पुढे भविष्यात कोणते कार्य करणार? हे सुरुवातीलाच ठरविलेपाहिजे. जीवनात चांगल्या मार्गाने यशस्वी होण्यासाठी काम करा. देशाचा जास्तीतजास्त विकास कसा होईल याकडे लक्ष द्या. देशाचे रक्षण करताना आजवर कित्येक जवान शहीद झाले. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात पोलिस अधिकारी, शिपाई शहीद झाले. कित्येक नागरिकांचे निष्पाप बळी गेले. त्यांना श्रध्दांजली वाहून त्यांचे कार्य अमर करावे असे आवाहन केले.

शहीद मनिष कदम हे देशाचे रक्षण करण्यासाठी अतिरेक्यांशी लढता-लढता शहीद झाले. त्यांनी देशासाठी प्राण गमावले, असे सांगून प्रत्येकाने देशहिताचे कार्य करावे, असे आवाहन शशिकांत कदम यांनी केले.

बॅ. नाथ विद्यालयाच्या महिला शिक्षण शाखेच्या विद्यार्थ्यांनी 'जखमा ओल्या अजूनही' या विषयांतर्गत भारतावर झालेले दहशतवादी हल्ले, बॉम्बस्फोट, २६/११ च्या हल्ल्यातील प्रसंगाचे भीषण स्वरूप रांगोळी, भित्तीपत्रके, छायाचित्रांच्या आधारे नागरिकांसमोर मांडण्याचा प्रदर्शनाद्वारे प्रयत्न केला. या प्रदर्शनाचे उद्‍घाटन शशिकांत कदम यांच्या हस्ते करण्यात आले. २६/११ च्या प्रतिकृती अंकात मेणबत्त्या पेटत ठेवून तसेच सांस्कृतिक विभागातर्फे बॉम्बस्फोट, हल्ले याबाबत माहितीचा सविस्तर उलगडा करत वीरगीतांद्वारे शहिदांना श्रध्दांजली वाहण्यात आली. मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन योगिता शिरसाट तर आभार माणिक गावडे यांनी मानले.

**...अन् डोळे पाणावले**

शहीद कर्नल मनिष कदम यांच्या मातोश्री सौ. कदम यांचा सत्कार करतेवेळी आपला मुलगा देशाचे रक्षण करतेवेळी दहशतवादी हल्ल्यात शहीद झाल्याने आपल्याला पोरका झाला. त्याबद्दल त्याच्या दुःखद आठवणीने सौ. कदम यांचे डोळे पाणावले. अन् दुसरीकडे आपल्या मुलाला देशाचे रक्षण करताना शहीद होवून देशहिताचे कार्य केले, त्याबद्दल आनंदही त्यांच्या डोळ्यात तरळत होता.

प्रहार

शब्दांना सत्याची धार

बुधवार, ३० नोव्हेंबर २०११

www.prahaar.in

पृष्ठ क्र 10

# जखमा ओल्या अजूनही...

## कुडाळ येथील छायाचित्रे, रांगोळी प्रदर्शनाला प्रतिसाद

**कुडाळ (वार्ताहर) :** २६ नोव्हेंबर २००८ चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला मुंबई शहरावर १० पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केलेल्या या हल्ल्यात ३४ परदेशी नागरिकांसह सुमारे १९७ जण ठार झाले, तर ८०० पेक्षा अधिक लोक जखमी झाले होते. २६/११ चे स्मरण म्हणून तीन वर्षे या हल्ल्याला पूर्ण होत असल्याने कुडाळ येथील बॅ. नाथ पै शिक्षण संस्थेने 'जखमा ओल्या अजूनही' हे दहशतवाद मुंबई हल्ल्यासह शहीद झालेल्या तत्कालीन कर्तव्यदक्ष पोलीस आणि जवानांचे सचित्र दर्शन देणारे प्रदर्शन संस्थेच्या सभागृहात मांडले आहे. २६ नोव्हेंबरपासून ४ डिसेंबरपर्यंत खुल्या असलेल्या या प्रदर्शनाला आतापर्यंत कुडाळसह जिल्ह्यातील हजारो नागरिक देशप्रेमींनी भेट देऊन प्रदर्शनात मांडण्यात आलेली छायाचित्रे, रांगोळ्या, देशभक्तीपर हल्ल्याचा निषेध करणारी गीते, वृत्तपत्रातील कात्रणे यांचा आस्वाद घेतला आहे. प्रदर्शनाला मोठा प्रतिसाद लाभत आहे.

कुडाळ एमआयडीसी येथील बॅ. नाथ पै संस्थेने २६ नोव्हेंबरला मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला ३ वर्षे पूर्ण होत असल्याने 'जखमा ओल्या अजूनही'चे आयोजन करून शहीद पोलीस, जवान व निष्पाप नागरिकांना एक आगळीवेगळी आदरांजली वाहिली आहे. २६ नोव्हेंबर २००८ ला सुमारे ६० तासांत अवघ्या १० दहशतवाद्यांनी केवळ मुंबईलाच नव्हे तर अवघ्या देशालाच ओलिस धरले होते. या हकनाक बळी गेलेल्या जिवांच्या नातेवाईकांचा आक्रोश त्यांच्या भावना तसेच अनेक कर्तव्यदक्ष देशाभिमानी शहीद पोलीस आणि जवानांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन या 'जखमा ओल्या'मध्ये पहायला मिळत आहे. आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेले व 'जगी शांतता नांदू दे' असा संदेश देणारे 'ताज रक्तरंजित नको आम्हाला फुलासारखं जीवन हवंय', 'कशाला हवा दहशतवाद सारे राहू आंनदात' असे सर्वधर्मियांत सलोखा आणि '२६/११ पुन्हा नको थांबवा दहशतवाद' असा भावनिक संदेश देणाऱ्या रांगोळी प्रदर्शनाला भेट देणाऱ्या प्रत्येकाचे लक्ष आपल्याकडे खेचून घेत आहेत. भारताच्या नकाशावर लाल रंगांच्या बल्बच्या माध्यमातून दहशतवाद्यांच्या निशाण्यावर असलेली प्रमुख ठिकाणे दाखविण्यात आली आहेत. २६/११ च्या रक्तरंजित हल्ल्यावेळी घडलेल्या विविध घटनांदरम्यान तेथील छायाचित्रकारांकडून काढण्यात आलेल्या बऱ्याच छायाचित्रांची त्याखाली सविस्तर माहिती लिहून भित्तीपत्रके तयार करण्यात आली आहेत. त्यातील करकरे, साळसकर हे ज्या गाडीने प्रवास करत होते ती गाडी, शहीद हेमंत करकरे यांचे गोळी लागून आरपार गेलेले हेल्मेट, रक्ताच्या थारोळ्यात पडलेले निष्पाप नागरिक, चकमकीत सामील झालेले पोलीस अधिकारी, त्यांची जन्मस्थळे, टोपण नावे आदी सविस्तर माहिती शिस्तबद्ध मांडण्यात आलेली आहे.




कुडाळ येथील बॅ. नाथ पै शिक्षण संस्थेत मांडण्यात आलेले प्रदर्शन.

प्रदर्शनगृहात प्रवेश करतानाच समोर उभारलेली स्मारके, पुष्पचक्राची प्रतिकृती लक्ष वेधून घेत आहे. प्रदर्शनात खऱ्या अर्थाने येथे प्रदर्शनाचा आस्वाद घेणाऱ्या प्रत्येकाला प्रेरणा तीच देत आहे.

रविवार दि. २०।११।२०११

प्रहार

# योगायोगानेच कलाकार बनलो

## फू बाई फू फेम अतुल तोडणकर यांच्याशी गप्पा-टप्पा



**कुडाळ (वार्ताहर) :** आपलं नांव आई-वडिलांनी अतुल ऐवजी योगायोग ठेवायला हवं होतं. कारण आपल्या आयुष्यात बरेच योगायोग घडले आहेत. एवढेच नव्हे तर योगायोगानेच आपण कलाकार घडलो. नाटके करता करता जीवनाला खरी कलाटणी मिळाली, असे मत फू बाई फू फेम सिनेनाट्य अभिनेते अतुल तोडणकर यांनी व्यक्त केले. ते बॅ. नाथ पै शिक्षण संस्था कुडाळ येथे आयोजित केलेल्या गप्पा-टप्पा कार्यक्रमात बोलत होते.

बॅ. नाथ पै शिक्षण संस्था कुडाळ संचालित विविध अभ्यासक्रमांतर्गत संस्थेचे अध्यक्ष उमेश गाळवणकर यांनी फू बाई फू, एकापेक्षा एक, पिंजरा, श्रीमंत गंगाधरपंत अशा विविध शो, मालिका, चित्रपटांमध्ये अजरामर भूमिका करून जनमानसात आपली लोकप्रियता निर्माण करणाऱ्या अतुल तोडणकर यांच्याशी गप्पाटप्पा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बॅ. नाथ पै संस्थेच्या विद्यार्थ्यांशी दिलखुलास बोलताना ते म्हणाले, फू बाई फू कार्यक्रमात मंगळागौरची भूमिका आयुष्यात आपल्यासाठी अविस्मरणीय ठरली. मंगळागौर साकारताना नऊवारी साडी, रंगभूषा आणि गेटअपसाठी तब्बल पावणे दोन तास लागले. त्याचा किस्सा सांगताना उपस्थितांना खळखळून हसविले. स्त्री भूमिका साकारताना करण्यात येणाऱ्या खटाटोपामुळे आपणाला यापुढे स्त्री भूमिका कधीच करायची नाही, असे ठरविल्याचे त्यांनी सांगितले.

'गंगूबाई नॉनमॅट्रीक' नाटकादरम्यान निर्मिती सावंत, पॅडीसोबत काम करताना आपणाला खूपच टेन्शन आले. पोटात गोळाच आला. तो आपल्या जीवनातील अविस्मरणीय क्षण होता. सगळ्यात 'पु. लं.' ही व्यक्तिरेखा साकारणे सर्वात मोठे कठीण काम असल्याचे तोडणकर यांनी मान्य केले. कलाकाराला कोणतीही जात नसते. त्याला विविध कलाविष्कार यायलाच हवेत, या मतावर आपण ठाम असल्याचे सांगत नाटक करणे म्हणजे फक्त रडणे, हसणे नाही तर समाजाला, रसिक प्रेक्षकांना विविध पैलू उलगडून दाखविणे होय. 'नटरंग' चित्रपटातील नाच्याप्रमाणे आपली 'पिंजरा' मालिकेत नाच्यासाठी निवड झाली, हे मोठे आव्हान होते. मालिका, चित्रपटात आपणाला रडायला मुळीच आवडत नाही. तरीही भावनाप्रधान भूमिका रंगवून लोकांपर्यंत पोहोचणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. पॅडी, अंकुश, भरतचे नाटक बघता-बघता केदार शिंदेची ओळख झाली. 'टूरटूर' नाटकात छोटीशी भूमिका मिळाली आणि आयुष्याचे सोने झाले. खरे प्रसिद्धीच्या झोतात आपणाला 'टूरटूर' नाटकाने आणल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

बी. एस. टी. त सन १९९६ साली इलेक्ट्रीकल इंजिनिअर म्हणून नोकरीला लागलेल्या अतुल तोडणकर यांनी नोकरी करता करता स्त्रियांच्या चेहऱ्यांवरील हावभाव न्याहाळले आणि स्त्री भूमिका अजरामर केली. साठपेक्षा जास्त वयाच्या महिलांची मंगळागौर बघूनच मंगळागौर भूमिका केली. मात्र, मराठी चित्रपटसृष्टीत सचिन पिळगांवकर एवढी स्त्रीची भूमिका सध्या कोणीच करू शकत नसल्याचे त्यांनी सांगितले.

आई-वडिलांचे आशीर्वाद आपणाला मोलाचे ठरले. नाटकाची मुळातच आवड असल्याने मालिका कमी करून नाटकाकडे वळायचे असल्याची आपली इच्छा त्यांनी प्रकट केली. तसेच 'हवीकशी सांगा नां' 'घाई आहे थोडीशी मला' ही गीते गाऊन उपस्थितांची वाहवा मिळविली. मंगळागौरमधील एक उखाणा घेतला आणि हास्यांचे कारंजे फुलवले. यावेळी त्यांचा संस्थाध्यक्ष उमेश गाळवणकर यांच्याहस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

# प्रहार

शब्दांना सत्याची धार

गुरुवार, ८ डिसेंबर २०११

पुरवणी पृ. ७ ।


# परि मन पंगु नाही

## अपंगत्वावर मात करत शिक्षण घेऊन शिक्षिका व्हायचंय !

## आजगांवच्या शैलजा पांढरेची महत्त्वाकांक्षा

● मनोज परब

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे नेहमी स्त्री असते असे म्हटले जात असले तरीही प्रत्येक यशस्वी स्त्रीच्या मागे पुरुष असतो असे एक युवती ठामपणे सांगत आहे. अपंगत्वावर मात करीत उच्च शिक्षण घेऊन शिक्षिका होणारच, या जिद्दीने झपाटलेल्या शैलजा पांढरे हिचे हे ठाम मत आहे. सन २००७ साली आलेल्या अचानक स्नायूंच्या दुर्बलतेमुळे दोन्ही पायांना अपंगत्व आलेल्या शैलजाने यावर्षी कुडाळ एम. आय. डी. सी. येथील बॅ. नाथ पै शैक्षणिक भवनात बी. एड. साठी प्रवेश घेतला आहे.

मूळ आजगांव (तांबळवाडी ता. सावंतवाडी) येथे राहणाऱ्या शैलजाचा जीवन प्रवास मुंबई जन्मठिकाणापासून सुरू झाला. बालपणी मामाकडे वास्तव्यास असलेल्या शैलजाने प्राथमिक शिक्षण नारायण विद्यामंदिर आसोली, माध्यमिक शिक्षण विद्याविहार इंग्लिश स्कूल आजगांव तर उच्च शिक्षण बा. म. गोगटे ज्युनिअर कॉलेज शिरोडा येथे झाले. आदर्श विद्यार्थिनी म्हणून शाळेत नावलौकिक लाभलेली शैलजा कलाशाखेत बारावीत तिसरी आली होती. अर्थशास्त्र कला शाखेतून तिने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात तृतीय वर्षी प्रथम क्रमांक पटकाविला होता. तिने एम. एस. सी. आय. टी., डीटीपी, मराठी-इंग्रजी टंकलेखन, ब्युटीपार्लर, सॉफ्ट टॉईज, एम्ब्रॉयडरी अशा बऱ्याच छंदांतून आनंद मिळविण्याचे प्रशिक्षण घेतले. सन २००६ पर्यंत एस. टी. बसने प्रवास करत तिने उच्चशिक्षण व विविध कोर्स पूर्ण केले. मात्र, त्यानंतर म्हणजेच वयाच्या बाविसाव्या वर्षी शैलजाच्या उत्तुंग भरारीच्या स्वप्नाला खऱ्या अर्थाने लगाम बसला. तिला दोन्ही पायांना आलेल्या स्नायू दुर्बलतेच्या असाध्य आजाराने ग्रासले. मान, कंबर अशा शरीराच्या अवयवांची हालचाल करताना मोठा त्रास व्हायचा. अशा परिस्थितीतही पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करण्याचा अट्टाहास तिचा होता. शिवाजी विद्यापीठातून अर्थशास्त्र व मराठी विषयातून एम. ए. शिक्षण पूर्ण केले. परीक्षेदरम्यान ज्या हॉलमध्ये बैठक क्रमांक यायचा तेथे दोन-तीन मजले चढून जाणेही अशक्य व्हायचे. तात्पुरत्या वसतिगृहात राहणे-झोपणे मुश्किलीचे बनले होते. आवड म्हणून यावर्षी एम. एस. सी. आय. टी अभ्यासक्रम पुन्हा केला. आई-वडिलांच्या आधाराशिवाय सुमारे तीन तासांचा कालावधी आपण इतरत्र काढू शकते का हे आजमावण्यासाठीच या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळविल्याचे शैलजाने सांगितले.

मे महिन्यामध्ये सहकार व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम केला. बी. एड. करून शिक्षिका व्हायचेच असा ध्यास लागलेल्या शैलजाने कुडाळमधील बॅ. नाथ पै शैक्षणिक संस्थेत बी. एड. अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे ठरविले. बी. एड. प्रवेश प्रक्रियेदरम्यान घेण्यात येणाऱ्या सी. ई. टी. परीक्षेत ७१ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला. बांबोळी-गोवा, बेळगाव, मुंबई, कोल्हापूर आणि आता सावंतवाडी स्नायू दुर्बलतेवर मात करण्यासाठी औषधोपचार करून त्यातून कायमची सुटका व्हावी यासाठी ठिकठिकाणी रुग्णालयांचे उंबरठे झिजवले. मात्र, ही दुर्बलता अद्यापही दूर झालेली नाही. भिंती, खुर्चीचा आधार घेऊन ती चालते. शैलजाच्या शिक्षण घेऊन खूप मोठे व्हावे मनोवृत्तीमुळे वर्गखोलीकडे चढून जाव्या लागणाऱ्या पायऱ्या तोडून संस्थेने तिला रॅम्पची सोय त्वरित करून दिली. डिगस माध्यमिक विद्यालयात तिला तीन दिवस पाठ घेण्याची संधीही उपलब्ध करून दिली. सर्व शिक्षकवृंद, मैत्रिणी तिला आधार देत आपल्याबरोबर ने-आण करतात, असे सांगतानाच शैलजाने आपल्याला आवड असूनही काही कामे करायला मिळत नाहीत. जिंकण्याची वृत्ती आहे. शिकून मोठे व्हावे आणि महाविद्यालयात शिक्षिका म्हणून नोकरी करावी यासाठी बी. एड. चे स्वप्न साकार होत आहे. अपंग असूनही शिक्षक-मैत्रीणींत मिळून-मिसळून अभ्यासक्रम पूर्ण करताना आपण स्वप्नात तर नाही ना? असा भास काही वेळा झाल्यासारखा आपल्याला वाटत असल्याचे सांगितले. बॅ. नाथ पै शैक्षणिक संस्थेत सेलिब्रेटीजना निमंत्रित करून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. या विद्यालयात 'फु बाई फू' फेम दिगंबर नाईक, अतुल तोडणकर, अभिनेते गिरीश ओक, जनार्दन परब यांनी आपल्याशी संवाद साधत आपले मनोधैर्य वाढविल्याचे सांगितले. तिला जनार्दन परब यांनी गणपतीची मूर्ती भेटही दिली. गिरीश ओक यांनी तिचे कौतुक करत पुष्पगुच्छ दिला. आपण पाच वर्षांनी पुन्हा कुडाळात येणार तेव्हा तू ठीकठाक असशील असे दिगंबर नाईक यांनी शैलजाला सांगितले. तर कोणतीही गोष्ट साध्य करायची असल्यास ती मनापासून करायची, शारीरिक अवस्थेकडे दुर्लक्ष करायचे असा मौलिक सल्ला अतुल तोडणकर यांनी तिला दिला आहे. शैलजा स्वतःच्या पायावर उभी रहावी आणि ती शिक्षिका व्हावी अशी तिचे वडील चंद्रकांत पांढरे यांची इच्छा आहे. तर आपल्याला शिकण्यासाठी उत्तरोत्तर सर्वतोपरी सहकार्य करणाऱ्या बॅ. नाथ पै शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उमेश गाळवणकर यांनीच आपल्या जाण्या-येण्यापासून ते पिंगुळीत राहण्याची सर्व जबाबदारी स्वीकारली असल्यामुळे हे सर्व शक्य झाल्याचे शैलजाचे म्हणणे आहे. मनाचा तोल आध्यात्मिक अवांतर वाचनामुळे सांभाळून राहिला आहे. आपल्याजवळ लक्ष्मी, सरस्वती आहे. मात्र धन्वंतरी नाही. पाठ फिरवली असल्याची खंत तिने व्यक्त केली.

दोन्ही पायांना दुर्बलता येऊनही मनाच्या सामर्थ्यावर जिद्दीने आपला भविष्यकाळ उज्ज्वल बनविण्यासाठी शैलजाची चाललेली ही धडपड खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. दिगंबर नाईक, अतुल तोडणकरसारखे आपणही तिला शब्दरूपी धीर देऊन तिचे मनोधैर्य वाढवायला हवे. उमेश गाळवणकरांसारखे आधारस्तंभ बनून तिच्या मागे भक्कमपणे उभे रहायला हवे. तरच शैलजासारख्या अनेक अपंग भगिनींचे आत्मबल वाढेल.




**फु बाई फू फेम दिगंबर नाईक यांच्याशी दिलखुलास संवाद साधताना शैलजा पांढरे सोबत इतर.**



**अभिनेते अतुल तोडणकर यांच्याशी गप्पाटप्पा करताना.**

www.esakal.com

सकाळ

कोल्हापूर । शुक्रवार, २ डिसेंबर २०११ । किंमत ₹ दोन

पुरवणी पृ. क्रं :- 2

# एड्स जनजागृतीसाठी कुडाळात प्रबोधन उपक्रम

कुडाळ, ता. १ : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आज पथनाट्यातून एड्स जनजागृतीचा संदेश दिला. शहरात एड्स जनजागृती रॅलीसुद्धा काढण्यात आली.

जागतिक एड्सदिनानिमित्त आज संत राऊळ महाराज महाविद्यालयाच्या वतीने एड्स जनजागृती रॅली शहरात काढण्यात आली. एड्सपासून जागरूक राहा, जीवन आपले सुखकर बनवा. एड्स जाणा; एड्स टाळा, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. या रॅलीचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. एस. के. पव[illegible]यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले, "विद्यार्थ्यांनी या रोगाची जनजागृती समाजामध्ये केली पाहिजे. एड्सचा वाढता प्रसार रोखण्यामध्ये युवा पिढी महत्त्वाची भूमिका बजाऊ शकते."

रॅलीत एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट एस. टी. आवटे, एनएसएस जिल्हा समन्वयक व्ही. जी. भास्कर, भास्कर जमदाडे, शरयू आसोलकर, प्राध्यापक सहभागी झाले होते.

एमआयडीसी येथील बॅ. नाथ पै महिला बीएड महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गांधी चौक, शिवाजीनगर येथे पथनाट्यातून एड्सचा संदेश दिला. या संस्थेच्या इंग्रजी माध्यमाच्या बालवाडीच्या मुलींनी रॅली काढली.



**कुडाळ :** येथे गुरुवारी बॅ. नाथ पै संस्थेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून एड्स जनजागृतीचा संदेश दिला. (छायाचित्र : अजय सावंत)

रविवार दि. 13/11/2011

: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ ■ सिंधुदुर्ग ■ वर्ष ४ ■ अंक ५ ■ पाने २० ('कोलाज'सह

# प्रहार

पृष्ठ क्र. 3

# ध्येयवादी माणसेच समाजाला मोठी करतात-अभिनेते डॉ. गिरीश ओक




**प्रा. मधू दंडवते यांच्या स्मृतीदिन कार्यक्रमप्रसंगी बोलताना डॉ. गिरीष ओक सोबत उमेश गाळवणकर, उद्योगपती सोपान गोरे, डॉ. प्रा. दिपाली काजरेकर, जयवंती परब, सौ. अमृता गाळवणकर आदी**

कुडाळ (प्रतिनिधी) :काही माणसे आपल्या ध्येयाने प्रेरीत होऊन कामात व्यस्त राहतात. त्यांचा हा अधीनपणा समाजासाठी असतो. म्हणून अशी माणसे समाजात मोठी होतात व समाजालाही मोठी करतात, असे प्रतिपादन प्रसिद्ध सिनेनाट्य अभिनेते डॉ. गिरीश ओक यांनी केले. कुडाळ येथील बॅ. नाथ पै शिक्षण संस्था येथे प्रा. मधु दंडवते यांचा ६ व्या स्मृतिदिन कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. कोकण रेल्वेस्टेशन येथील प्रा. मधु दंडवते यांच्या तैलचित्राला यावेळीअभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने डॉ. ओक यांनी केले. यावेळी व्यासपीठावर चेअरमन उमेश गाळवणकर, उद्योगपती सोपान गोरे, डॉ. प्रा. दिपाली काजरेकर, जयवंती परब, सौ. अमृता गाळवणकर आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी मधु दंडवतेंच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी त्यांच्याबद्दल मनोगत व्यक्त केले. यावेळी गाळवणकर यांनी मनोगत व्यक्त केले. नर्सिंग कॉलेजमधील उल्लेखनिय यशाबद्दल विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगिता शिरसाट यांनी तर आभार विनया गोडकर हिने मानले.

पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

# भारताला विजेसाठी अणू आणि सौरऊर्जा हे दोनच पर्याय

## अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांचे कुडाळ येथील चर्चासत्रात प्रतिपादन

कुडाळ : प्रतिनिधी

भारतात दर माणसी वीज उत्पादनात भारताचा जगात १५० वा नंबर लागतो. भारताला विजेची मोठी गरज आहे. आजच्या घडीला देशाला विजेची गरज भागविण्यासाठी अणुउर्जा व सौरउर्जा हे दोनच पर्याय आहेत. असे प्रतिपादन अणुउर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांनी कुडाळ येथे बोलताना केले.

ध्येय प्रतिष्ठान आणि बॅ. नाथ पै शिक्षणसंस्था व कुडाळ तालुका पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमानातून कुडाळ येथील बॅ. नाथ पै शिक्षण संस्थेच्या सभागृहात 'अणुउर्जा समज आणि गैरसमज' या चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. काकोडकर बोलत होते. यावेळी कालनिर्णयचे संचालक जयेंद्र साळगांवकर, भाजपचे आ. प्रमोद जठार, काँग्रेसचे आ. राजन तेली, माजी जि. प. अध्यक्ष संजय पडते, जि. प. उपाध्यक्ष दिनेश साळगावकर, अस्मिता बांदेकर, अभय शिरसाट, राजू राऊळ, राजन नाईक, डॉ. प्रसाद देवधर, डॉ. पी. डी. वजराटकर आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**उर्जा निर्मितीत भारत ५ व्या क्रमांकावर**

**तर प्रती माणसी वीज उत्पादनात १५० व्या क्रमांकावर**

**जगात ४०० हून अधिक रिॲक्टर सुरू**

**जपानसारखा स्फोट झाल्यास भारत सज्ज**

डॉ. काकोडकर म्हणाले, भविष्याचा वेध घेऊन येत्या २०५० सालापर्यंतआर्थिकउन्नतीआणिउर्जेतील वाढ याचा समन्वय साधण्यासाठी १० पट वीज निर्माण करण्याची आवश्यकता आहे. नपेक्षा २०५० पर्यंत ४ लक्ष मेगावॅट वीजेचा तुटवडा आपल्याला जाणवणार असल्याची भीती डॉ. काकोडकर यांनी यावेळी व्यक्त केली. सद्यस्थितीत लगतच्या चीन देशाची वीज उत्पत्ती आपल्यापेक्षा चौपट आहे. त्यामुळे आपल्याला अणूउर्जा आयात करण्याचा पर्यायही स्वीकारावा लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. जलविद्युत प्रकल्पातून ५ टक्के, अपारंपारीक उर्जेतून २ टक्के तर सोलर मधून आवश्यक तेवढी वीज मिळू शकते पण सोलर उर्जा २४ तास उपलब्ध होऊ शकत नाही. त्यातच आजच्या घडीला सौर उर्जा महाग आहे. तरिही ती २४ तास स्टोरेज करावयाची झाल्यास अधिक खर्चिक आहे. सद्यस्थितीत जगात उर्जेची जी साधने आहेत ती कमी होवू लागली आहेत. त्यामुळे प्रगत देशाप्रमाणे भारतानेही उर्जेची व्यवस्था करून ठेवणे गरजेचे असल्याचे मत डॉ. काकोडकर यांनी व्यक्त केले त्यासाठी अणुउर्जा आणि सोलर उर्जेची जोड आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

जपानमधील हिरोशिमा आणि नागासकी या शहरांवर टाकलेल्या अणुबॉम्ब नंतर मानवजातीला भिती असणे स्वभाविक आहे. त्या ठिकाणच्या झालेल्या वित्त हानीवर अभ्यासकांनी सखोल अभ्यास केला. त्याचा तेथील दुसऱ्या पिढीला त्रास झालानसल्याचेसंशोधकांनीस्पष्टकेले आहे. अणुस्फोटातील रेडियशनमुळे कॅन्सर होतो, हे जरी खरे असले तरी कॅन्सर रोग बरा करण्यासाठी त्याच रेडियशनचा वापर करावा लागतो हे कुणी नाकारू शकत नाही. दैनंदिन जीवनातही रेडियशनला प्रत्येक व्यक्तीला सामोरे जावे लागते.

अलिकडे जपानमध्ये मोठा अणुस्फोट झाला तरी सद्यस्थितीत चालू असलेली रिॲक्टर केंद्रे सुस्थितीत चालू आहेत. कारण जपानची अर्थव्यवस्थाही याच अणुउर्जेवर अवलंबून आहे. दरम्यान सर्वसामान्य रेडियशनचे वातावरणावर कोणतेही परिणाम होत नसून भारतात आपण प्रगत अणुभट्ट्या लावणार आहोत. भविष्यात अणुस्फोट झालाच तर भारत त्याला सक्षमपणे तोंड देण्यास तयार असल्याचेही डॉ. काकोडकर यांनी सांगितले. अणुउर्जा समज आणि गैरसमज यावर तब्बल चार तास माहिती त्यांनी दिली.

जयेंद्र साळगांवकर

अणुउर्जेला पर्याय नसून सद्या जगात ४०० हून अधिक रिॲक्टर चालू आहेत. आज भारतात बुध्दीवादी वर्ग आहे. त्यामुळे येत्या चार-पाच वर्षात उर्जेच्या उत्पादनात आपण चीनला मागे टाकू पण त्यासाठी गरज आहे ती वीजेची देश ही इकॉनॉमी आहे. अशा इकॉनॉमी देशात असे उर्जेचे प्रकल्प उभारले जातील असे जयेंद्र साळगांवकर यांनी यावेळी सांगून जैतापूर प्रकल्प चांगल्या प्रकारे व्हावा असे यावेळी ठणकावून सांगितले. या चर्चासत्राचे प्रास्ताविक अमित सामंत यांनी केले तर सुत्रसंचालन प्रफुल्ल वालावलकर यांनी केले.



कुडाळ येथील अणुउर्जा समज आणि गैरसमज या चर्चा सत्रात माहिती देताना डॉ. अनिल काकोडकर. सोबत जयराज साळगावकर.

www.pudhari.com

# पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

दि. 19.8.2011
पुरवणी पृष्ठ क्र. 4.

# 'तुम्ही जगा, आम्हांलाही जगू द्या' प्राणीमात्रांची आर्त विनवणी

## बालनाट्यातून पर्यावरण जनजागृती

**कुडाळ : शहर वार्ताहर**

तुम्ही स्वत:च्या स्वार्थासाठी पृथ्वीतलावरची जंगले वेगाने नष्ट करत आहात. यामुळे आम्ही बेघर झालो आहोत. 'रहायला जागा नाही, खायला अन्न नाही, प्यायला पाणी नाही' अशा परिस्थितीत आम्ही जगायचे तरी कसे? प्लीज, तुम्ही जगा व आम्हांलाही जगू द्या. अशी आर्त विनवणी जंगलाचा राजा वाघांसह सर्व प्राण्यांनी मानवाला केली. पृथ्वीतलावरची जंगले वेगाने नष्ट होत आहेत. परिणामी जंगली प्राणी बेघर होत आहेत.



कुडाळ : बॅ. नाथ. पै विद्यालयात 'जंगली बाणा' हे बालनाट्य सादर करताना कलाकार (छाया : अथर्व डिजीटल)

महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग पुरस्कृत बालनाट्य प्रयोग मुंबईच्या माता अनुसया प्रोडक्शनतर्फे बॅ. नाथ. पै. विद्यालयाच्या सभागृहात सादर करण्यात आला. 'जंगली बाणा' या दोन अंकी बालनाट्यातून वन्यजीव व वृक्षसंवर्धन या गोष्टींची गरज या नाट्यातून प्रभावीपणे मांडण्यात आली. हे बालनाट्य कथास्वरूपात दाखविण्यात आले. मोठमोठी जंगले, त्यामध्ये पशु-पक्षी मुक्त संचार, पण हळूहळू जंगले नष्ट होऊ लागतात, जंगलामध्ये मानवाचा वावर वाढला आहे. प्राण्यांच्या दैनंदिन जीवनात अनेक समस्या निर्माण होत आहेत. शेवटी जीवन मरणाचा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला आहे. आता तर मानव बंदूकांच्या सहाय्याने निर्दयपणे शिकार करू लागला आहे. वाघ, सिंह, हत्तीसारखे प्राणीही मानवाच्या गोळ्यांना बळी पडत आहेत. आता अखेरचा उपाय या मानवालाच विनंती करणे. समस्त प्राणी मात्रांच्या जाहीर सभेत सर्व प्राणी आर्त स्वरात मानवाला एकच साद घालतात. 'हे मानवा कृपा कर, तुम्ही जगा व आम्हालाही जगू द्या.

सिने अभिनेत्री नयना आपटे, दिग्दर्शक आणि निर्माता प्रवीणकुमार भारदे, आदिती जोशी, मुग्धा फणसे गीता गायकवाड आदी कलाकार या बालनाट्यात सहभागी झाले होते. शिक्षक, पालक, विद्यार्थी व रसिक मोठ्या संख्येन उपस्थित होते.